Estd-1962
NAAC Grade "A++"(CGPA-3.52)

Maharashtra State Innovation Society

**शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रमाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण संकल्पनेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन**

# 'नवनिर्मितीतून शाश्वत विकासाकडे'

पुरातन काळापासून मानवी जीवनातील अमूलाग्र बदल हे साध्या व नाविन्यपूर्ण संकल्पनेतून घडत गेले आहेत. चाकाचा आविष्कार असो किंवा ऊर्जा समीकरण, प्रत्येक महान नवकल्पनेमध्ये साधेपणा होता. प्रत्येक माणसात— तो सामान्य असो किंवा शास्त्रज्ञ—त्यांच्या कल्पनेत नावीन्यपूर्णता असते. काही लोक आपल्या संशोधनाद्वारे या नाविन्यपूर्णतेला मूर्त स्वरुप देतात. शिवाजी विद्यापीठ अशा सामान्यांतील नाविन्यपूर्ण संशोधकांना आमंत्रित करत आहे. अशा नवकल्पनांचे संगोपन करण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्याचा शिवाजी विद्यापीठाचा मानस आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. या केंद्राच्या अंतर्गत SUK Research and Development Foundation या Section 8 कंपनीची Companies Act, 2013 नुसार रीतसर नोंदणी करण्यात आली आहे. तुमच्या नाविन्यपूर्ण कल्पना ज्या टप्प्यावर (उदा.कल्पना, प्रक्रिया, नमुना) आहेत त्या आमच्यापर्यंत पोहचवा. या केंद्रामार्फत आम्ही त्याला योग्य व्यासपीठ मिळेल याची खात्री देतो. तुमच्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे अधिकार अबाधित राहतील व त्याची गोपनीयता सांभाळली जाईल. सर्व सहभागी व्यक्तींना प्रमाणपत्र दिले जाईल तसेच काही दर्जेदार व निवडक प्रकल्पांना रोख बक्षिस दिले जाईल. ज्या प्रभावी, कार्यक्षम कल्पना असतील अशा कल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तांत्रिक सहाय्य प्रदान करेल. यासाठी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेशी संपर्क साधावा किंवा sciil@unishivaji.ac.in या इमेल वर आपल्या संकल्पना पाठवण्यात याव्यात असे आवाहन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांचेकडून करण्यात येत आहे.

Registration link here:- https://forms.gle/8rGqSWdCuSbPfprGA

अधिक माहितीसाठी संपर्क:—

१. श्री.सुधीर देसाई — ९६७३७४८१८१
२. डॉ.वैशाली भोसले — ९४२२५८२७१०
३. डॉ.अजित कोळेकर — ९४२३०४१९४५
४. कार्यालय संपर्क क्र — ०२३१—२६०९०८७